# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

## (सकाळ)

जा.क्र. ४८१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—०६/०८/२०१६.

**१) भांडण व शिविगाळ करुन गंभिर जखमी केले . :—**

दिनांक ०४/०७/२०१६ रोजी २२.०० वा. दर. यातील जखमी विष्णु राजु बागडे वय २७ वर्ष, व आरोपी हे सख्ये भाऊ असुन जखमीने आरोपी भावा सोबत भांडण करुन शिविगाळ केल्याने आरोपी हा चिडुन जावुन विटेच्या तुकडयाने जखमीचे डोक्यावर मारुन गंभिर दुखापत करुन जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादी दिपक अशेक बागडे वय २३ वर्ष, रा. क्रांती वार्ड कोचे गॅस एजन्सी जवळ भंडारा व डॉ. परिक्षण रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३०७ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. तोडासे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) व्यायाम शाळेतील सामानाची चोरी . :—**

दिनांक ०४/०८/२०१६ रोजी २०.०० ते ०५/०८/२०१६ रोजी ०९.०० वा. दर. यातील पुर्वमाध्यमीक शाळा गणेशपुर भंडारा येथे असलेली ग्रा. पं. च्या व्यायामशाळेच्या खोलीचा समोरील दाराचा ताला कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन ताला तोडु न आत प्रवेश करुन त्यात ठेवलेले व्यायामाचे लोखंडी साहीत्य डंबल सेट २८ नग, वेटलिफ्टीग रॉड ४ नग, वेटलिफ्टीग प्लेट ३२ नग, कि. २६,०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४६१,४५७,३८० भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कावळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहे.

**३) मोटार सायकलची चोरी . :—**

दिनांक ०३+०४/०८/२०१६ चे रात्र दर. यातील फिर्यादी बहादुर धरमलाल कुसराम वय २६ वर्ष, रा. नवलेसरा जि. बालाघाट ह. मु. सनफ्लॅग कंपनीचा बॅरेक वरठी यांची हिरो एक्सप्रो पॅशन कंपनीची मोटार सायकल क्र. एमपी ५० एमजे ६७०३ कि. ३५,०००/—रु. ची ही सनफ्लॅग कंपनीचे बॅरेक समोर ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पटले पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**४) बोगस डॉक्टर यांच्या विरुध्द गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०५/०८/२०१६ रोजी १८.३५ वा. दर. यातील फिर्यादी हे पोलीस विभागातील लोकसेवक असुन दि. ०५/०८/२०१६ ला महा. कॉन्सील इंडीयन मेडीसीन यांचे कडुन आरोपी हा बोगस डॉक्टर असुन त्यांचे विरुध्द गुन्हा नोदवीण्यात यावा. अशी लेखी तक्रार प्राप्त झाल्याने यातील आरोपी हा कोणत्याही प्रकारचे वैद्यकीय व्यवसाय करण्याबाबतचे प्रमाणपत्र न बाडगता व नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीत नसतांना सुध्दा तोत्यागीरी करुन व वैद्यकीय व्यवसाय करुन लोकांची फसवणुक करीत असल्याचे परिस्थीती जन्य पुराव्या वरुन निष्पन्न झाल्याने व फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व महा. कॉन्सील ऑफ इंडीयन मेडीसीन या परिषदेच्या लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४१९ भादंवि सहकलम ३३,३६ महा. वैद्यकीय अधि. १९६१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. राऊत पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**५) अवैध दारू अडयांवर धाडी. :–**

दिनांक ०६/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. गोबरवाही येथील परीसरातील अवैध दारु अडयांवर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हा दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०५ लिटर हातभट्टी दारू असा एकुण कि. ३०० /–रू. चा माल जप्त करण्यात आला.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०११२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.